Light of Life Trust

# लाईट ऑफ लाईफ टाईम्स

अंक १९वा

ऑक्टोबर २०२२

## आमचे ध्येय

***गरिबीचे पिढ्यानपिढ्याचे चक्र खंडित करा, एका वेळी एक जीवन.***

गेल्या १५ वर्षाहून अधिक काळात ग्रामीण भारतातील ३,९८,३२९ पेक्षा जास्त व्यक्तींचे जीवन प्रभावित करण्यात आम्हाला यश मिळाले आहे. संस्थेच्या आनंदो व जागृती प्रकल्पांच्या माध्यमातून आम्ही शिक्षण, समुदाय विकास, कौशल्य विकास, आरोग्य सेवा आणि पर्यावरण संवर्धन असे विविध उपक्रम राबवीत आहोत.

## विश्वस्त मंडळ

- **श्रीमती विली डॉक्टर** – संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त
- **श्रीमती गायत्री रुईया** – विश्वस्त
- **श्री. मनोज मुरारका** – विश्वस्त
- **श्री. जितेंद्र मेहता** – विश्वस्त
- **श्री. पुनीत बी. आनंद** – विश्वस्त
- **श्री. ॲश्दीन डॉक्टर** – विश्वस्त

**शुभ दीपावली**

## 'सुनेहेरे अल्फाज भाग २' कार्यक्रमाला मिळालेला भरभरून प्रतिसाद

दिनांक १४ ऑक्टोबर २०२२ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने नेहरू सेंटर ऑडिटोरियम, वरळी, मुंबई येथे 'सुनहेरे अल्फाझ' भाग २ हा गीत गायनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. सुप्रसिद्ध गायिका श्रीमती संजीवनी भेलांडे यांनी या कार्यक्रमात हिंदी सिनेमाच्या सुवर्णकाळातील सुमधुर गीतांचे गायन केले. या कार्यक्रमाला ८०० हून अधिक हितचिंतकांची उपस्थिती लाभली होती.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या अनंत कार्यक्रमाच्या लाभार्थी विद्यार्थ्यांनाही एक गाणे प्रेक्षकांसमोर सादर करण्याची संधी मिळाली. प्रेक्षकांनी प्रचंड टाळ्यांच्या गजरात या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.










**लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट बिल डेस्कवर आहे. तसेच ४७ बँकांच्या बिल पे टॅबवरही आहे.**

DBS | DCB BANK | HDFC BANK | IndusInd Bank | kotak | standard chartered | YES BANK

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला 'मोस्ट रिस्पॉन्सिबल एनजीओ' पुरस्कार प्रदान




दिनांक ७ जुलै २०२२ रोजी, ताज एंड्स लँड, बांद्रा येथे रिस्पॉन्सिबल बिझनेस अवॉर्ड्स अंतर्गत लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला' मोस्ट रिस्पॉन्सिबल एनजीओ' पुरस्कार प्राप्त झाला. वर्ल्ड सीएसआर डे अँड वर्ल्ड सस्टेनेबिलिटीया संस्थेचे स्वायत्त संचालक व संस्थापक डॉ. आर. एल. भाटिया यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या संस्थापिका व व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती विली डॉक्टर आणि सहकारी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

## अकोला येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट,आजीविका आणि कौशल्य विकास केंद्र, शिवार यांना महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (MKCL) कडून पुरस्कार प्रदान

दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, अकोला येथील आजीविका आणि कौशल्य विकास केंद्र, शिवार यांना महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (MKCL) कडून' ग्रेट वर्क सर्टिफिकेशन' पुरस्कार मिळाला. शिवार केंद्रात KLiC अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल तसेच समाजातील जास्तीत जास्त व्यक्तींपर्यंत पोहोचल्याबद्दल हा पुरस्कार संस्थेला मिळाला.




## नव भारत जागृती केंद्रासोबत लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची नवीन भागीदारी



संस्थेसाठी गौरवपूर्ण ठरलेली बाब म्हणजे, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने नव भारत जागृती केंद्र यांच्यासोबत काम सुरु केले आहे. महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील कर्जत आणि खालापूर तालुक्यांतील २० शाळांमध्ये सुरू असलेल्या २० पूरक शिक्षण केंद्रांतील ८०० गरजू विद्यार्थ्यांना विज्ञान, इंग्रजी आणि गणित विषयांचे गुणवत्तापूर्ण शिक्षण देता यावे या हेतूने लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, नव भारत जागृती केंद्र यांच्यासोबत जोडली गेली आहे.

दिनांक २८ ऑगस्ट, २०२२ रोजी, नवभारत जागृती केंद्र, हजारीबाग, झारखंड येथील श्री सतीश गिरीजा यांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या सदस्यांना नवभारत जागृती केंद्राची माहिती ओळखसत्रा द्वारे दिली.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आनंदो प्रकल्पाला महाराष्ट्र सीएसआर समीटकडून पुरस्कार प्रदान




आनंदो प्रकल्पाद्वारे महाराष्ट्राच्या समाजातील घटकांवर सकारात्मक प्रभाव दाखविल्याबद्दल दिनांक २७ जुलै, २०२२ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला महाराष्ट्र सीएसआर समीटकडून पुरस्कार मिळाला. 'महाराष्ट्र राज्याच्या शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कार्पोरेट सोशल रेस्पॉन्सिबिलिटीची उपयोगिता' या विषयावर महाराष्ट्र सीएसआर समिट, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह, नरीमन पॉइंट येथे आयोजित करण्यात आली होती.

## लाईट ऑफ लाईफट्रस्टला गाईडस्टार इंडिया प्लॅटिनम सील पुरस्कार प्राप्त

दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजी, गाईडस्टार इंडिया यांच्यातर्फे लाईट ऑफ लाईफ संस्थेला 'गाईडस्टार इंडिया प्लॅटिनम सील' पुरस्कार प्राप्त झाला.




गाईडस्टार इंडिया येथे लाईट ऑफ लाईफट्रस्टचे प्रोफाईल पाहण्यासाठी खालील लिंकला भेट द्या.
https://guidestarindia.org/Summary.aspx?CCReg=941

## दापोली येथे नवीन फिरत्या दवाखान्याचे (मोबाईल मेडिकल युनिट) उद्घाटन




लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आणि लोढा व्हेंचर्स फाँडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन फिरत्या दवाखान्याचे उद्घाटन, दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी, रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील दापोली येथे करण्यात आले. लोढा व्हेंचर्स फाँडेशनच्या श्रीमती स्तुती अहलुवालिया, श्री दीपेंद्र गुप्ता त्याचप्रमाणे श्री गौतम कनोजे, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट जागृती प्रकल्प व्यवस्थापक, प्रमुख पाहुणे श्री आर. एम. दिघे – गट विकास अधिकारी, व श्री किशोर जाधव महाड तालुका वैद्यकीय अधिकारी इत्यादी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. दापोलीमधील काही प्रमुख ग्रामस्थही यावेळी आवर्जून उपस्थित होते.

## रामगढ शेखावटी, जिल्हा सिकर, राजस्थान येथे लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आजीविका आणि कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन







दिनांक १३ ऑगस्ट, २०२२ रोजी, रामगढ शेखावटी, जिल्हा सिकर, राजस्थान येथे लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या नवीन आजीविका आणि कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. हा सोहळा दूरदृष्यप्रणाली अर्थात ऑनलाईन पद्धतीने साजरा झाला. या प्रसंगी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती विली डॉक्टर, विश्वस्थ श्रीमती गायत्री रुईया, विश्वस्थ श्री अ‍ॅश्दीन डॉक्टर, विश्वस्थ श्री पुनीत बी आनंद, मुख्य कार्यकारी अधिकारी (मानद) श्री प्रदीप कोप्पीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रमेश दासवानी, मुख्य कार्यवाही अधिकारी श्रीमती कमल दमानिया, श्रीमती शीला अय्यर – मार्केटिंग प्रमुख इत्यादी मान्यवर उपस्थित होते. नवीन आजीविका आणि कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून या परिसरातील महिला व युवकांना संगणक व शिवणकाम इत्यादी कौशल्य प्रशिक्षणांचा लाभ घेता येणार आहे. येथील संगणक प्रशिक्षण केंद्रासाठी इरेज पॉवर्टी, हाँगकाँगयांचे सहाय्य लाभले आहे.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची 'प्लांट ए ट्री' मोहिम यशस्वी

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट अभिमानाने जाहीर करत आहे की संस्थेच्या 'प्लांट ए ट्री' या वृक्षारोपण मोहिमेला भरभरून प्रतिसाद मिळाला आहे. तिवरे येथील जीवन आशा समुदाय केंद्र तसेच संस्थेच्या कर्जत तालुक्यातील लाभार्थी शेतकऱ्यांच्या जमिनीवर एकंदरीत १५१८ रोपांची लागवड करण्यात आली. या मोहिमेचे १००० रोपांच्या लागवडीचे उद्दिष्ट अशा रीतीने सहज पार झाले.




मुकुल माधव फाँडेशन ऑफ फिनोलेक्स इंडस्ट्रीज ली. आणि लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने, दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ रोजी, कर्जत तालुक्यातील तिवरे येथील जीवन आशा समुदाय केंद्र येथे ३०० रोपांची लागवड करण्यात आली. ही रोपे मुकुल माधव फाँडेशन यांच्या तर्फे, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या 'प्लांट अ ट्री' मोहिमेसाठी दान करण्यात आली होती. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कृषी विभागाची टीम तसेच श्री विवेक शिंदे, श्री जितेंद्र जाधव व श्री सौरभ पांडे यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.



दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट व एचडीएफसी इर्गो यांनी, जीवन आशा समुदाय केंद्र, तिवरे येथे १४० रोपांची लागवड केली. श्री लोकेश साळवी – एचडीएफसी इर्गोचे प्रमुख आणि इतर ५३ स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी झाले होते.




सप्टेंबर महिन्यातील ग्लोबल व्हॉलेंटीअर्स सप्ताहाचे औचित्य साधून, मॉर्निंग स्टार या संस्थेने दिनांक १२ सप्टेंबर २०२२ रोजी, ३४० रोपांची लागवड करण्याचा उपक्रम हाती घेतला. ही रोपे संस्थेच्या जीवन आशा समुदाय केंद्रात लावण्यात आली. मॉर्निंग स्टारचे १७० कर्मचारी या उपक्रमात सहभागी झाले होते. या उपक्रमासाठी श्रीमती स्नेहलता भोगटे इंडिया लीड, श्री पंकज परमार हेड ऑफ ग्लोबल न्यू प्रोडक्ट डेव्हलपमेंट, इंडेक्सेस, श्री सागर रानडे – हेड ऑफ इंडेक्सेस, श्रीमती शीला अय्यर – मार्केटिंग प्रमुख, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, तसेच श्री गौतम कनोजे – लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट जागृती प्रकल्प व्यवस्थापक इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील तिवरे येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या जीवन आशा समुदाय केंद्रावर ३४७ रोपे शेतकऱ्यांनी दान केली त्याचप्रमाणे लाभार्थी आणि पाहुणे यांनी ३६१ वैयक्तिक रोपांची लागवड केली.

## लाईट ऑफ लाईफट्रस्टचे प्रशिक्षणार्थी (इंटर्न्स)



कॅनडायेथील अल्बर्टा विश्व विद्यालयाचे बीएससी संगणक शाखेचे विद्यार्थी श्री आर्यन सिंग आणि सिंबायोसिस स्कूल ऑफ लिबरल आर्ट्स पुणे येथील बीएससी शाखेच्या विद्यार्थिनी श्रीमती प्रणामी ओझा यांनी, जुलै २०२२ मध्ये लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट मध्ये प्रशिक्षण पूर्ण केले. त्यांच्या प्रशिक्षण कालावधीत त्यांनी संस्थेच्या कर्जत तालुक्यातील जागृती व आनंदो प्रकल्पांसोबत निधी उभारणी व जनसंपर्क उपक्रमांतर्गत कार्य केले.



श्री यश मालगुंडकर व श्रीमती श्लोका श्रीराम या युनिव्हर्सल बिझनेस स्कूलच्या विद्यार्थ्यांनी, जीवन आशा समुदाय केंद्र, तिवरे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथे २ महिन्यांचे प्रशिक्षण यशस्वीपणे पार पाडले. या दोन महिन्यांच्या कालावधीत या विद्यार्थ्यांनी आजीविका आणि कौशल्य विकास, आरोग्य व पर्यावरण संवर्धन उपक्रमांतर्गत कार्य केले.

## युनिव्हर्सल बिझनेस स्कूलतर्फे आयोजित कार्निवल एक्सट्रावॅगंझा उपक्रमात लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा सहभाग



दिनांक २६ ऑगस्ट २०२२ रोजी, युनिव्हर्सल बिझनेस स्कूलतर्फे आयोजित कार्निवल एक्सट्रावॅगंझा उपक्रमात लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला स्टॉल लावण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. जीवन अशा समुदाय केंद्र, तिवरे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथे लाभार्थ्यांनी बनविलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री या ठिकाणी करण्यात आली. या वेळी ग्राहकांकडून अत्यंत उदंड प्रतिसाद मिळाला.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कर्जत व मुरबाड येथील फिरत्या दवाखान्यांमार्फत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन



दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी, नायर सुपर स्पेशालिटी नेत्र चिकित्सालय तसेच कर्जत व मुरबाड येथील संस्थेच्या फिरत्या दवाखान्यांमार्फत, जीवन अशा समुदाय केंद्र, तिवरे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथे नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टसाठी गौरवास्पद अशी बाब म्हणजे, संस्थेच्या कोंदिवडे केंद्रातून ऑप्टोमेट्रिस्ट झालेली आनंदो लाभार्थी कु. दिपाली क्षीरसागर ही नेत्र तपासणी करणाऱ्या टीमची एक सदस्य होती. ही टीम, श्री सौरभ जोशी – वरिष्ठ ऑप्टोमेट्रिस्ट यांच्या नेतृत्वाखाली होती.

एकूण ६३ रुग्णांना नेत्र तपासणी शिबिराचा लाभ मिळाला.

दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मुरबाड केंद्राच्या फिरत्या दवाखान्याच्या कर्मचारीवर्गाने इन्फिगो आय केअर हॉस्पिटल, मुरबाड यांच्या सहकार्याने जांभुळवाडी गावात ३० जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थी तसेच २९ समुदाय सदस्यांसाठी नेत्र तपासणी शिबीर आयोजित केले होते.

## जागतिक ओआरएस सप्ताह साजरा




कर्जत आणि मुरबाड केंद्रातील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या फिरत्या दवाखान्याच्या टीमने दिनांक २७ व २८ जुलै, २०२२ रोजी जागतिक ओआरएस सप्ताह साजरा केला. अतिसार व त्यामुळे शरीरातील पाणी कमी होणे यावर उपाय म्हणून ओआरएस वापरण्याचे फायदे याबद्दल सहा गावांमधील ३११ लाभार्थ्यांना वैयक्तिक जागरुकता सत्रे देण्यात आली.

amazonsmile
You shop. Amazon gives.

अमेझोन तुमच्या पात्र अमेझोन स्माईल खरेदीच्या किंमतीपैकी ०.५ % तुमच्या पसंतीच्या धर्मादाय संस्थेला दान करते. **QR कोड स्कॅन करून** लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला सपोर्ट करा किंवा खालील लिंकला भेट दया.
**http://smile.amazon.com/ch/20-5402443**

## हर घर तिरंगा – आझादी का अमृत महोत्सव – भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे

१५ ऑगस्ट रोजी साजऱ्या होणाऱ्या स्वातंत्र्यदिनासाठी, भारताच्या स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्षपूर्ती निमित्त, भारत सरकारच्या 'हर घर तिरंगा – आझादी का अमृत महोत्सव' या मोहिमेच्या अनुषंगाने लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या जागृती आणि आनंदो प्रकल्पांच्या टीमकडून कर्जतमधील लाभार्थी कुटुंबांना १००० पेक्षाही जास्त राष्ट्र ध्वजांचे (तिरंग्याचे) वाटप करण्यात आले.

या महत्त्वाच्या प्रसंगाचे स्मरण म्हणून लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या अनंत टीमने भारतीय स्वातंत्र्यावर एक गाणे रचले व प्रसारित केले.





## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टव मॉर्निंग स्टार यांचा संयुक्त दान उपक्रम

दिनांक १२ सप्टेंबर २०२२ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट व मॉर्निंग स्टार यांनी संयुक्तपणे दान उपक्रम राबविला. या अंतर्गत लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या लाभार्थ्यांना ५० दंत संच, ५० प्रथमोपचार संच, ५० सौंदर्य साधनांचे संच आणि ६ पाणीगाडे यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी स्नेहलता भोगटे (इंडिया लीड), श्री पंकज परमार (हेड ऑफ ग्लोबल न्यू प्रोडक्ट डेव्हलपमेंट, इंडेक्सेस), श्री सागर रानडे (हेड ऑफ इंडेक्सेस), श्रीमती शीला अय्यर (लीड मार्केटिंग, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट), तसेच श्री गौतम कनोजे (लाईट ऑफ लाईफ जागृती प्रकल्प) व्यवस्थापक इत्यादी मान्यवर उपस्थित होते.






## अनंत कार्यक्रमाच्या लाभार्थ्यांचा गुरुपौर्णिमा उत्सव साजरा




दिनांक १७ जुलै, २०२२ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या अनंत कार्यक्रमाच्या लाभार्थ्यांनी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा केला. यावेळी तबला वादन, नृत्य व गायन आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी ८१ विद्यार्थ्यांनी विविध कला गुण दर्शन सादर केले. विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांप्रती व शिक्षकांप्रती आदरभाव तसेच धन्यवाद व्यक्त करण्याची संधी या निमित्ताने मिळाली.

## झॉन्टा क्लब ऑफ बॉम्बे १ व झॉन्टा क्लब ऑफ ड्रीसडेन यांच्या सोबत संयुक्तपणे जाणीव जागृती सत्रांचे आयोजन





दिनांक २७ ऑगस्ट २०२२ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आणि झॉन्टा क्लब ऑफ बॉम्बे १ व झॉन्टा क्लब ऑफ ड्रीसडेन यांच्या संयुक्त विद्यमाने, मासिक पाळी व या काळातील स्वच्छता या विषयवार जाणीव जागृती सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. बालविवाहामुळे मुलींच्या आयुष्यावर होणारे दुष्परिणाम याबद्दलचे सत्रही यावेळी घेण्यात आले. या सत्रानंतर, रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्याच्या आम्बोट गावातील युवती व महिलांना १८९ स्वच्छता संचांचे वाटप करण्यात आले. यावेळेस झॉन्टा क्लब ऑफ बॉम्बे १ या संस्थेचे मान्यवर दुरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून कार्यक्रमात सहभागी झाले होते.

## नवीन भागीदारी

### लाईट ऑफ लाईफ ट्रस्टव लॉरेन्स अँडमेयो (इंडिया) प्रा. ली. (एल.वाय.एन.एक्स) यांची नवीन भागीदारी

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट अभिमानाने जाहीर करते की, लॉरेन्स आणि मेयो (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (LYNX) सोबत आम्ही नवीन भागीदारी सुरु करत आहोत. विद्यार्थ्यांसाठी, DGCA मानकांना अनुसरून असणाऱ्या ड्रोन ट्रेनिंग अकादमी मॉडेलद्वारे मायक्रो कॅटेगरी मल्टी–रोटर ड्रोन पायलट कोर्स आणि स्मॉल कॅटेगरी मल्टी–ड्रोन पायलट कोर्स सुरु करण्यासाठी लॉरेन्स आणि मेयो (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (LYNX) महत्वाचे सहाय्य करणार आहे.

### लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची, अहलुवालिया पायलट ट्रेनिंग इन्स्टिटयूट (ए.पी.टी.आय.) सोबत भागीदारी

अहलुवालिया पायलट ट्रेनिंग इन्स्टिटयूट (ए.पी.टी.आय.) सोबत नवीन भागीदारी सुरु झाल्याचे लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट अभिमानाने घोषित करत आहे. नागरी व संरक्षण विषयक प्रारंभिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना करून विविध प्रशिक्षण उपक्रम हाती घेण्यासाठी लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट ए.पी.टी.आय. सोबत जोडली गेली आहे. युवकांना नागरी विमान वाहतूक, सशस्त्र आणि निमलष्करी दलात नोकरी मिळविण्याच्या दृष्टीने तसेच पोलीसभरती प्रवेश परीक्षा आणि शारीरिक प्रशिक्षण कौशल्य विकास यासाठी हे प्रशिक्षण कार्यक्रम उपयुक्त ठरतील.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या लाभार्थ्यांचे अभिमानास्पद यश



लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट अत्यंत अभिमानाने घोषित करते की कर्जत तालुक्याच्या कोंदिवडे केंद्रातील आनंदो प्लस लाभार्थी श्री आदेश देशमुख याने ८८.५% गुणांसह अँग्लो इस्टर्न मेरी टाइम अकादमी, खांडपे येथून नॉटिकल सायन्स विषयातील पदविका अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. त्याने कॉलेजमध्ये पाचवा क्रमांक पटकावला आहे. आदेश देशमुख आता ट्रेनी नेव्हिगेशन ऑफिसर म्हणून अमेरिकेतील टेक्सास येथे जाणार आहे. नॉटिकल सायन्स क्षेत्रात करिअर करणारा, आदेश देशमुख हा लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा पहिला विद्यार्थी आहे.



लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट अत्यंत अभिमानाने जाहीर करते की, संस्थेच्या वरळी केंद्रातील आनंदो लाभार्थी कु. मोहित शर्मा याने जिल्हा स्तरीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे.

## संपर्क

**मुख्य कार्यालय**

वन बीकेसी, सी-विंग, युनिट क्रमांक: १५१९, प्लॉट नं.: सी-६६,
जी-ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पु),
मुंबई - ४०० ०५१. दूरध्वनी: +९१ २२ ६९०४ ७४७०
ईमेल: connect@lightoflifetrust.org

**शाखा कार्यालये:**

**महाराष्ट्र :** अहमदनगर • अकोला • अलिबाग • जालना • कर्जत • माणगाव • मुंबई • मुरबाड • नंदुरबार • वाशिम • यवतमाळ
**मध्य प्रदेश :** सिवनी **राजस्थान :** बिजोलिया
**ओडिशा :** अंगुल

www.lightoflifetrust.org +91-9820229445

@LightOfLifeTrustIndia @lightoflifetrust_lolt @lightoflifetrst lightoflifetrust youtube.com/c/lightoflifetrust

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वरळी केंद्रातील लाभार्थी गिनीज जागतिक विक्रम बनविण्यात सहभागी



दिनांक ५ सप्टेंबर २०२२, या शिक्षक दिनी, वरळी केंद्रातील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या विद्यार्थ्यांनी एका अनोख्या उपक्रमात भाग घेतला - ITC च्या कॅन्डीमन फँटॅस्टिक चोकोबार XL यांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने ५१३० चॉकलेट बारची सर्वात लांब ओळ रचून ऐतिहासिक विक्रम रचला विजय मिळविला आणि गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड™ मध्ये नाव कमविले. विद्यार्थ्यांसह ३० स्वयंसेवकांच्या मदतीने ४ ते ६ तासांत हा विकअम केला गेला. पूर्ण झाल्यावर लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वतीने विद्यार्थ्यांना लाईन बनवण्यासाठी वापरण्यात आलेले विलक्षण XL चोकोबारचे वाटप करण्यात आले.

## मुंबईच्या जुहू येथील बिल्लबॉन्ग हाय इंटरनॅशनल स्कुलच्या विद्यार्थ्यांची लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला भेट



दिनांक ७ सप्टेंबर, २०२२ रोजी, मुंबईच्या जुहू येथील बिल्लबॉन्ग हाय इंटरनॅशनल स्कूलच्या दहावीच्या ५ विद्यार्थ्यांनी श्री रिचर्ड सॅम्युअल यांच्यासह जीवन आशा समुदाय केंद्र, तिवरे, तालुका कर्जत येथे भेट दिली. जीवन आशा समुदाय केंद्रातील जागृती प्रकल्पा अंतर्गत सुरु असलेल्या विविध उपक्रमांची माहिती घेतल्यानंतर त्यांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कृषी पथकासह कोशाणे वाडी गावातील पाणी समस्येचे सर्वेक्षण केले.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मुख्यालयास पाहुण्यांची भेट



दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी, सर-ला एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री चेतन मेहरोत्रा यांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मुख्यालयास भेट दिली. सर-ला ट्रस्ट गेल्या ५ वर्षांपासून ३०० मुलांच्या शिक्षणासाठी मदत करत आहे.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला पेटीएमवरून देणगी देण्यासाठी
लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला ऑनलाइन देणगी देण्यासाठी

Contribute Now ! Paytm

https://m.paytm.me/LOLT